# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो. पु. प्रा निश्चयेन परिवर्तनम्। झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

७१५
०८/०९/२०२२

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/अंभोप्र/मा.क्र.२४/१२६३/२०२२
दि. ०७/०९/२०२२.

<u>अंशत: भोगवटा प्रमाणपत्र</u> (विंग A)

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

<u>वाचा :-</u>

१) मुळ बांधकाम परवानगी क्र. २८४/२०१५ दि. २६/०२/२०१५.
२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. १५९५ दि. १०/०८/२०१८.
३) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. १९३५ दि. २४/०९/२०१८.
४) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. २५०८ दि. ०१/११/२०१८.
५) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. झो.पु.प्रा. /४७२५/२०१९ दि . ०४/१०/२०१९.
६) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. झो.पु.प्रा. /९३८/२० दि. २४/०८/२०२०.
७) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. झो.पु.प्रा. /२३४४/२१ दि. ३१/१२/२०२१.
८) विकसक यांचे दि. २६/०८/२०२२ रोजीचे पत्र.
९) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि.०७/०९/२०२२.

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे सि.स.नं. ११९७, फा. प्लॉट क्र. ५६० भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता या कार्यालयाकडून जा.क्र. झो.पु.प्रा. /२३४४/२१ दि. ३१/१२/२०२१ अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. योजनेचे विकसक यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केलेनुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विषयांकित योजनेतील इमारतीमधील विंग A च्या लोअर ग्राउंड वरील १ ते ३७ दुकान गाळे व अप्पर ग्राउंड L१ L२ मधील शोरूम क्र. १ ते ४ तसेच पहिल्या मजल्यावरील दुकान क्र. १०१ ते १०६ व १०९ ते ११४ करिता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.मंजुर बांधकाम नकाशानुसार इमारत निहाय तरतुद खालीलप्रमाणे आहे.

विंग A - (विक्री घटक )

| अ.क्र. | मजले | मंजूर नकाशानुसार | | | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुनर्वसन घटक | | विक्री घटक | | |
| | | Resi. | Comm. | Resi. | Comm. | |
| १) | लोअर ग्राउंड फ्लोअर | -- | -- | -- | दुकान क्र. १ ते ३७ | ३७ दुकाने |
| २) | अप्पर ग्राउंड फ्लोअर L१ | -- | -- | -- | शोरूम क्र. UG१ ते UG४ | ०४ शोरूम |
| ३) | अप्पर ग्राउंड फ्लोअर L२ | -- | -- | -- | शोरूम क्र. UG१ ते UG४ | ०४ शोरूम |
| ४) | पहिला मजला | -- | -- | -- | दुकान क्र. १०१ ते १०६ व १०९ ते ११४ | १२ दुकाने |
| एकूण-४९ दुकाने + ०८ शोरूम | | | | | | |

निवासी विक्री घटक :- निरंक
बिगर निवासी विक्री घटक :- ४९ दुकाने + ०८ शोरूम
एकूण :- ४९ दुकाने + ०८ शोरूम

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department ★ APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी उक्त इमारतीच्या बांधकामास योजनेचे सबंधित आर्कीटेक्ट यांनी दिलेल्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व विकसक यांनी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व विहित नमुन्यातील हमीपत्राचे आधारे खालील नमुद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत अंशत: बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंशत: बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले अंशत: बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) मंजुर नकाशानुसार इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

८) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिका असल्यास सदर सदनिकांचे वाटप, अंशत: भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदीनुसार सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

९) सदर योजनेसाठी लागू होणारे शुल्क, जसे देखभाल खर्च, आणि पायाभूत सुविधा शुल्काची एकूण रक्कम टी.डी.आर. मागणीपूर्वी अदा करणे आवश्यक आहे.

१०) मंजूर नकाशानुसार आवश्यक असणाऱ्या Partition Walls संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक यांची राहिल.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

(सही)

प्र.सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे.

प्रत :- १) **पलाश रियाल्टर्स**, ६०२ रूची अपार्टमेंट्स १ ला मजला, साई सर्व्हीस स्टेशन मागे, डेक्कन जिमखाना, पुणे-०४.

२) आर्कि. राहुल माळवदकर, ६७२/६७३, लोकेश सोसायटी, बी समर्थ इमारत, प्लॉट क्र. १० बिबवेवाडी, पुणे - ३७.

३) **तहसिलदार, ताबा विभाग**, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव.

४) **संगणक अधिकारी**, झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.